दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक ३३ वा बुधवार दि.०३ जूलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# पीएम मोदींच्या भाषणादरम्यान लोकसभेत विरोधकांचा गोंधळ

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील अभिनंदन प्रस्तावावर पंतप्रधान मोदी यांनी संबोधन केले. यावेळी पंतप्रधान मोदींच्या भाषणादरम्यान सभागृहात विरोधकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यामुळे विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे पंतप्रधानांना आपले भाषण काही काळ थांबवावे लागले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधकांना खडसावले पंतप्रधान नरेंद्र मोदी संसदेत भाषणाला उभे राहताच विरोधकांनी संसद सभागृहात प्रचंड गदारोळ घातला. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधकांना आपले वर्तन सभागृहातील संसदीय परंपरेनुसार नाही, असे खडसावून शांत राहण्याचे आवाहन केले. तरीही विरोधकांनी घोषणाबाजी सुरूच ठेवली. विरोधकांच्या प्रचंड गदारोळत देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे भाषण सुरूच ठेवले. न्याय दो न्याय दो, विरोधकांच्या घोषणा यावेळी नीट परीक्षेबाबत चर्चा करण्याची विरोधकांची जोरदार मागणी केली. न्याय दो न्याय दो, अशा घोषणा विरोधकांनी दिल्या. परंतु, मोदींनी आपले भाषण सुरूच ठेवले. ते म्हणाले की, लोकसभेची निवडणूक देशातील मोठी निवडणूक ठरली. तिसऱ्यांदा देशाची सेवा करण्याची संधी जनतेने आम्हाला दिली आहे. जनतेने आमच्या १० वर्षांच्या कामाचा रेकॉर्ड बघितला आहे. देशसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. जगभरात भारताची विश्वासार्हता वाढली- पीएम मोदी ''भ्रष्टाचाराविरोधातील झिरो टॉलरन्स धोरणासाठी देशाने आम्हाला आशीर्वाद दिला. आज जगभरात भारताची विश्वासार्हता वाढली आहे. आमच्या प्रत्येक धोरणाचे, प्रत्येक निर्णयाचे, प्रत्येक कृतीचे एकमेव उद्दिष्ट प्रथम भारत आहे. असे पीएम मोदी म्हणाले. पीएम मोदी पुढे म्हणाले की, जगातील सर्वात मोठ्या निवडणूक प्रक्रियेत जनतेने आम्हाला निवडून दिले आहे आणि मी काही लोकांच्या वेदना समजू शकतो. ते सतत खोटेपणा पसरवत असतानाही त्यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

# शेतरस्त्यासाठी बौद्ध शेतकऱ्याचे अमरण उपोषण

निलंगा :- सरकार भाजप शिवसेनेचे असो की,काँग्रेस राष्ट्रवादीचे असो पुरोगामी महाराष्ट्रात आजही मागासवर्गीय बौद्ध समजावरील अन्यायाची मालिका काही केल्या थांबत नाही.याचाच एक प्रकार आज लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील रामतीर्थ गावात उघडकीस आला. येथील बौद्ध शेतकरी शेतीच्या रस्त्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय निलंगा यांच्या कार्यालयासमोर कुटुंबासमवेत अमरण उपोषणास बसले आहेत. सदरील शेतकऱ्यास भारत सरकार मार्फत सीलिंग ऑक्ट नुसार ई.स.१९७० ते १९८०च्या दशकात जमीन मिळालेली आहे. सदरील जमीन कसून आजतागायत आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवीत आहेत. मात्र जातीय द्वेषातून जातीय आकसापोटी मागील अनेक वर्षापासून ते आजतागायत सर्वे नंबर ३९/५ला सर्वे नंबर ३६ मधून चालू असलेला जुना वहिवाट असलेला दक्षिण उत्तर दिशा असलेला गाडीरस्ता जेसीबीच्या सहाय्याने नष्ट करून बौद्ध शेतकऱ्यावर अन्याय केला आहे. त्यामुळे बौद्ध शेतकऱ्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे. याबाबत पीडित शेतकऱ्याने न्याय मागणीसाठी ई.स.एप्रिल २०२३ रोजीपासून तहसील कार्यालय तथा दंडाधिकारी निलंगा यांच्या न्यायालयात दाद मागितली सदरील प्रकरण निलंगा तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार श्री प्रवीण आळंदकर यांच्या न्यायालयात चालू असून एक वर्षे २ महिने उलटूनही अद्याप न्याय्य मिळाला नाही. श्री.प्रवीण आळंदकर यांनी दिनांक ०५जुलै २०२३ रोजी अंतरिम आदेश देऊन रस्ता खुला करून देण्याचा आदेश दिला होता मात्र जातीय आकस असलेला सर्वे नंबर ३६चा शेतकरी पुत्र अमोल वसंतराव माने व नायब तहसीलदार आळंदकर यांनी संगनमत करून अंतिम आदेश दिला नाही.यामुळे मागील दोन वर्षापासून सदरील शेतकऱ्याचे उत्पादित झालेल्या धान्याची अद्यापही रास होऊ शकली नाही. रस्ता बंद केल्यामुळे शेतीत वाहन घेऊन जाता येत नाही ना येता येत नाही त्यामुळे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.शिवाय यावर्षीचा खरीप हंगामासाठी शेतीची मशागत करता आली नाही व आता पेरणीही करता येणार नाही. एकंदरीत या सर्व त्रासाला कंटाळून अखेर न्याय मिळवण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय निलंगा यांच्या कार्यालया समोर अन्यायग्रस्त कुटुंब अमरण उपोषण करीत आहेत.या उपोष्णाद्वारे त्यांनी खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत. त्यात प्रामुख्याने निलंगा तहसील कार्यालयातील सदरील प्रकरणाशी संबंधित असलेले नायब तहसीलदार श्री प्रवीण आळंदकर यांच्या कारभाराची खातेनिहाय चौकशी करून त्यांना तात्काळ बडतर्फ करण्यात यावे. मौजे रामतीर्थ येथील जमीन सर्वे नंबर ३९/५ या शेतीला जाणारा रस्ता सर्वे नंबर ३६ मधून दक्षिण उत्तर जाणारा जुना वाहिवाटीचा गाडीवाट रस्ता तत्काळ खुला करून न्याय मिळावा ,सर्वे नंबर ३६मधून सर्वे नंबर ३९/५ या जमिनीकडे जाणाऱ्या रस्त्याचे सरकारी दफ्तरी नोंद घेण्यात यावी. सदरील शेतकरी हा मागासवर्गीय बौद्ध समाजाचा असल्याने जाणीवपूर्वक जुना वहीवाटीचा रस्ता नष्ट करून शेतकऱ्यावर अन्याय करणारे सर्वे नंबर ३६ च्या मालकाचे सुपुत्र अमोल वसंतराव माने यांच्या विरोधात ऑट्रोसीटी कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात यावा. सर्वे नंबर ३६ च्या मालकाचे सुपुत्र व त्यांचे इतर साथीदार यांच्याकडून परिवाराच्या जीवितास गंभीर धोका असल्याने पोलिस संरक्षण देण्यात यावे,सदरील जमीन ही भारत सरकारने सिलिंग ऑक्ट नुसार मागासवर्गीय लोकांना दिल्यामुळे जमिनीस सरकारने संरक्षण द्यावे ,मागील दोन वर्षापासून सदरील जमिनीचा रस्ता अडवल्यामुळे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई तत्काळ देण्यात यावी. या मागण्यासाठी पीडित कुटुंब अमरण उपोषणास बसले आहेत आता निलंगा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी श्री शरद झाडके काय निर्णय देतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे....




## आयुक्त बाबासाहेब मनोहरे याची वरिष्ठ निवडश्रेणी मध्ये पदोन्नती होऊन लातूर येथे प्रपत्र बढती झाल्याबद्दल अशोक हनवते, उत्तम कांबळे यांनी दिल्या शुभेच्छा



लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेचे कर्तव्यदक्ष, पारदर्शक,आयुक्त बाबासाहेब मनोहरे याची वरिष्ठ निवडश्रेणी मध्ये पदोन्नती होऊन लातूर येथे प्रपत्र बढती झाल्याबद्दल अशोक हनवते, संपादक - दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन दिल्या शुभेच्छा.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय

मुंबई :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढविण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यावेळी उपस्थित होते. योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या महिलांना १ जुलैपासून लाभ देण्यात येईल असा महत्वपूर्ण निर्णय घेतानाच योजना सुलभ आणि सुटसुटीतपणे राबविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी विभागाला दिले. अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देतानाच योजनेसाठी एकर शेतीची अट वगळण्याचा, लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्याचा, परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधिवास प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल, असा निर्णय यावेळी घेण्यात आला.
अडीच लाख रुपये उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार असून योजनेमध्ये सुधारणा केलेल्या निर्णयांचा शासन निर्णय तातडीने जाहिर करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# नाल्यांची व रिंग रोडवर पडलेल्या वैद्यकीय कचऱ्याची ताबडतोब साफसफाई करण्यात यावी..

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या वतीने मनपाला निवेदन



लातूर :- लातूर शहर महानगरपालिका हद्दीला लागून काशिलिंगेश्वर ग्रामपंचायतीला लागून असलेल्या परिसरात, रिंग रोडवर मोठ्या प्रमाणावर कचरा,रोडवर तर काही ठिकाणी वैद्यकीय कचरा टाकला जात आहे.काशिलिंगेश्वर ग्रामपंचायत लगतच सर्वच ठिकाणी छोटे-मोठे रस्ते कचरा व नाले साफसफाई न केल्यामुळे रस्तावर घाण पाणी साचत आहे. अस्वच्छतेच्या कारणाने माश्या आणि डासांचा प्रकोप वाढला आहे. तसेच गेल्या काही दिवसांपासून वैद्यकीय कचरा हा खुल्ले आम् पद्धतीने टाकल्याने वाढत आहे.अनेक छोटी-मोठी हॉस्पिटले यांच्याकडे जमणाऱ्या सुई-सिरिज,कापसाचे-बोळे, बँडेज,प्लास्टर व रोग्यांचे सांडपाणी इत्यादी गोष्टींचा जैविक वैद्यकिय घातक कचऱ्याचा अंतर्भाव आहे.यामुळे दुर्गंध व अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याची समस्या चिंतेचा विषय होत आहे.आयुक्त यांनी यासंदर्भात पुढील ४ दिवसात,वैद्यकीय जैविक कचरा,नाले साफसफाई करून घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बक्तावर बागवान, ड.नागरगोजे,ड.निशांत वाघमारे,ड.अशिष चव्हाण,श्री. कोयले,पुरोषोत्तम पाटील,अभिषेक चव्हाण व डी.उमाकांत यांच्या सह्या आहेत..

# विविध राज्यातून गुरे चोरणारी टोळी पकडली

जळगाव : निंभोरा (ता. रावेर) पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दोन वेगवेगळ्या गुन्ह्यात पाच म्हशी चोरीला गेल्या होत्या. या गुन्ह्याचा तपास करीत असताना, निंभोरा पोलिसांच्या हाती चक्क आंतराज्यीय गुरे चोरणारी टोळी हाती लागली असून त्यांच्याकडून ११ जनावरांसह २ बोलेरो, २ दुचाकी, असा १६ लाखांचा ऐवज ताब्यात घेतला आहे. २४ एप्रिल आणि १० जूनला म्हशी चोरीला गेल्या होत्या. सहाय्यक पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे, ज्ञानेश्वर चौधरी, अविनाश पाटील यांनी तीन महिन्यात तब्बल ६० साठ ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजचे संकलन करून संशयितांची छायाचित्रे मिळविली. सहाय्यक निरीक्षक बोचरे यांनी फैजपूरचे निरीक्षक नीलेश वाघ आणि पोलिसांच्या मदतीने संशयित तुकाराम रुमालसिंग बारेला (रा.मध्य प्रदेश) याला ताब्यात घेतले. त्याने चौकशीत टोळीचे नावे सांगितली. त्यावरून पोलिसांनी मध्य प्रदेशातून तुकाराम बारेला याचे साथीदार धर्मेंद्रसिंह दुरसिंह बारेला (रा. ढेरिया खंडवा), शांताराम बिल्लरसिंह बारेला (रा. हिवरा, ब-हाणपूर), सुभाष प्रताप निंगवाल (रा. दहिनाला), मस्तरीराम काशिराम बारेला (न्हावी, ता. रावेर) अशा सहा संशयीतांना अटक केली. धर्मेंद्रसिंह याच्याविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल असून मध्य प्रदेशातील ४ जिल्ह्यातून त्याला हद्दपार केले आहे. या टोळीने सिल्लोड, बुलढाणा, मुक्ताईनगर, फैजपूर, रावेर यांसह मध्य प्रदेशातून जनावरे चोरी करून कत्तलीसाठी विक्री केल्याची माहिती उघडकीस आल्याचे पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# विदेशी गंगाजळीत भर

वेगवेगळ्या देशांमध्ये काम करणार्या भारतीयांनी २०२३ मध्ये १२० अब्ज डॉलरची कमाई देशाला पाठवली होती. जागतिक बँकेच्या ताज्या अहवालानुसार, फॉरेन रेमिटन्सच्या बाबतीत भारत जगात आघाडीवर पोहोचला आहे. त्यानंतर मेक्सिको, चीन, फिलिपाईन्स आणि पाकिस्तान आहेत, ज्यांना अनुक्रमे ६६, ५०, ३९ आणि २७ अब्ज डॉलर मिळाले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे कुशल भारतीय कामगारांसाठी अमेरिका हे सर्वात मोठे गंतव्यस्थान आहे.

अनेक विकसित देशांव्यतिरिक्त आखाती देशांमध्येही मोठ्या प्रमाणात भारतीय प्रवासी काम करत आहेत. जगातील सर्वांत जास्त प्रवासी भारतीय आहेत आणि ते विविध देशांच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, याचे संकेत आपल्याला ७.५ टक्के दराने वाढत असणार्या फॉरेन रेमिटन्सच्या रकमेतून मिळतात. भारतीयांची अमेरिकेनंतर सर्वाधिक कमाई संयुक्त अरब अमिरातीतून झाली असून ती एकूण रेमिटन्सच्या १८ टक्के आहे. याखालोखाल सौदी अरेबिया, कुवेत, ओमान आणि कतार यांचा क्रमांक लागतो. २०२४ मध्ये भारतात येणार्या रेमिटन्समध्ये ३.७ टक्के आणि २०२५ मध्ये चार टक्क्यांनी वाढ होईल, असा जागतिक बँकेचा अंदाज आहे.

संयुक्त अरब अमिराती आणि भारत यांच्यात आपापल्या चलनात व्यवहार करण्यासाठी व्यवस्था केल्यामुळे आता औपचारिक माध्यमांद्वारे अधिक पैसे पाठवले जात आहेत. यूएई आणि सिंगापूरमध्ये यूपीआय पेमेंट सिस्टीम लागू झाल्यामुळे तेथे गेलेल्या भारतीय कामगारांचा मायदेशात पैसे पाठवण्याचा खर्च कमी होईल आणि वेळही वाचेल. भारतातील अतिकुशल कामगार अमेरिका आणि इतर विकसित देशांमध्ये काम करत आहेत; तर कमी कुशल कामगार स्थलांतरित आखाती देशांमध्ये आहेत. या वितरणामुळे बाह्य घडामोडींचा प्रभाव कमी होणार आहे. तसेच बदलत्या जागतिक परिस्थितीतही भारताच्या फॉरेन रेमिटन्समध्ये स्थैर्य राहील.

स्थलांतर आणि रेमिटन्स हे आर्थिक आणि मानवी विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. एकीकडे स्थलांतरित कामगार आपल्या कौशल्याने आणि कठोर परिश्रमाने इतर देशांच्या विकासाला गती देतात; तर दुसरीकडे ते या देशांमधील कमाई मायदेशी पाठवून आपल्या देशाच्या परकीय चलनाचा साठा समृद्ध करतानाच आपल्या कुटुंबाच्या प्रगतीचा आधार बनतात. जागतिक स्तरावर अनेक देशांमध्ये कामगारांची उपलब्धता पुरेशा प्रमाणात नाहीये. अनेक देशांमध्ये बेरोजगारीची समस्या आहे, तशीच कौशल्याची कमतरता आहे. असे अनेक देश स्थलांतराला प्रोत्साहन देत आहेत. भारतासारख्या देशांना याचा फायदा होत आहे. रेमिटन्समधील वाढ नक्कीच उत्साहवर्धक आहे. आपल्या सर्वांना आठवत असेल की, २००८ मध्ये आलेल्या जागतिक आर्थिक मंदीच्या काळामध्ये याच फॉरेन रेमिटन्सने भारतीय अर्थव्यवस्थेला बसणार्या हादर्यांपासून दिलासा देण्याचे खूप मोठे काम केले होते.

आज जगभरामध्ये पाकिस्तान, श्रीलंका यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्था विदेशी गंगाजळीअभावी संकटग्रस्त होत चालल्या आहेत. अशा वेळी विविध देशांमध्ये काम करणार्या भारतीयांकडून भारताच्या विदेशी गंगाजळीमध्ये मोठी भर पडत असेल तर त्याचे मोल आपण ओळखले पाहिजे. त्यादृष्टीने या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आज आखातासह अनेक देशांमध्ये कार्यरत असणार्या भारतीय कर्मचार्यांना जोखीम, शोषण, भेदभाव इत्यादींचा सामना करावा लागतो. अलीकडेच कुवेतमधील एका इमारतीला लागलेल्या आगीत अनेक भारतीय कामगारांचा मृत्यू झाला. इटलीत एका भारतीय कामगाराचा रस्त्यातच मृत्यू झाला. अशा स्थितीत तेथील दूतावास आणि उच्चायुक्तांचा सक्रिय हस्तक्षेप आवश्यक ठरतो.

# सेवा हाच जगण्याचा धर्म मानणारे:पांडुरंग देडे

किसान शिक्षण प्रसारक मंडळ बोरगाव काळेच्या लातूर येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयात तीस वर्षे लिपीक आणि जोडजवळा येथील समता माध्यमिक विद्यालयात गेली दोन वर्षांपासून वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत,शिक्षकेतर कर्मचारी संघाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सेवा हाच धर्म मानून सेवेशी ईमान राखणारे पांडुरंग नामदेव देडे हे रविवार,दि.३० जून २०२४ रोजी आपल्या नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त झाले,त्यानिमित्त त्यांच्या जीवन कार्याचा हा लेखाजोखा..

बोरगाव काळे,ता.जि.लातूर येथील सर्वार्थाने वंचित,येस्करकी करणार्या देडे परिवारात नामदेव आणि फुलाबाई या निरक्षर माय-बापांच्या पोटी पाच मुले आणि तीन मुली अशी आठ अपत्ये जन्मली.त्यातील एक मुलगा वारला.थोरला विठ्ठल,नंतरचा शिवाजी मजूरी करुन निर्वाह करतात.एक भाऊ गौरच्या राजर्षी शाहू विद्यालयात लिपीक पदावर कार्यरत असून,बहिणी आजूबाजूच्या गावांमध्ये आपापल्या सासरी नांदत असतात.त्यात चार नंबरचा पांडुरंग यांचा १६ जून १९६६ रोजी जन्म झाला.त्यांचे बालपण गावीच गेले. शिक्षणाचा गंध नसलेल्या या घरातील पांडुरंगाला वडीलांनी गावच्या जिल्हा परिषद शाळेचा रस्ता दाखविला.तिथे सातवी पर्यंत त्यांचे शिक्षण झाले.पुढे आठवीला याच गावातील खाजगी अनुदान विद्यालयात प्रवेश मिळाला.

समाजवादी विचारांचे नेते तथा शिक्षण संस्थाचालक वसंत काळे यांच्या या अनुदान शाळेत विजय चव्हाण या गुरुजींमुळे पांडुरंगाच्या जीवनाला वैचारिक कलाटणीच मिळाली.अभ्यासावर पांडुरंगची निष्ठा होती म्हणून ते आठवी ते दहावी या काळात पहिल्याच नंबरने उत्तीर्ण होत गेले.विशेष म्हणजे विजय चव्हाण गुरुजी हे या शाळेत सेवारत होते,ते राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते होते,त्यांनी पांडुरंग व अन्य मुलांवर राष्ट्रप्रेम व संस्कारशील मूल्यांची रुजवण केली.पांडुरंगाने या १९८० ते १९८२ तीन वर्षाच्या शालेय जीवनात राष्ट्रसेवा दलाचा शाखा नायक म्हणून जबाबदारी पार पाडली.राष्ट्रसेवा दलाशी ते तन,मन,धनाने कायमचे जोडले गेले आहेत.महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना उदगीर गाटावे लागले. तिथे प्राचार्य डॉ.ना.य.डोळे यांच्या छत्रछायेखाली त्यांच्या जीवनाची संस्कारशील वाट अधिक समृध्द होत गेली.तिथे त्यांचे बी.ए.पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले.मध्यंतरी औसा येथील आजीम पॉलिटेक्निकमधून सि व्हील ड्राफ्टसमनचा कोर्सही करुन घेतला. पुढे एम.ए.इतिहास प्रथम वर्षे शिक्षण झाले परिस्थितीमुळे ते अर्धवट राहिले.

राष्ट्रसेवा दलाच्या तालमीत वाढलेला,उपेक्षित घरातला,गरजू,नामांतराच्या लढ्यात झोकून देणारा,सामाजिक अन्याय,अत्याचाराची चीड असणारा चळवळ्या पोरगा कामाचा म्हणून वसंतराव काळे यांनी आपल्या यशवंतराव चव्हाण विद्यालयात पांडुरंगला १९९० साली लिपीक पदावर सेवेची संधी दिली. पिढ्यानपिढ्या व्यवस्थेने चाबलून टाकलेल्या देडे परिवाराच्या गोतावळ्याला यामुळे अर्थपूर्णता प्राप्त करुन देणारी जणू ही संधी होती.याबद्दल त्यांनी स्मृतीशेष वसंतराव काळे यांची कृतज्ञता व्यक्त केली.

घरादाराच्या गाडा चालण्यासाठी देडे यांना नोकरीची संधी मिळाली, मग त्यांच्या विवाहाचा बेत ठरला. कळंब तालुक्यातील नायगाव येथील जुन्या नातेसंबंधातील हरिभाऊ चव्हाण यांची कन्या प्रेमा यांच्याशी त्यांचा १९९० मध्ये रितीरिवाजाने विवाह झाला. बी.ए.झालेल्या प्रेमाला नोकरीची संधी होती.त्याही बर्यापैकी आर्थिक हातभार लावू शकल्या असत्या पण एकत्र कुटुंब पध्दतीमुळे आणि घरातील इतर महिला निरक्षर असल्याने त्यांनी घरात राहूनच सर्वांच्या भल्याबुर्यासाठी कष्ट उपसले, गृहिणी म्हणूनच राहिल्या.प्रेमा याही संघटनात कमी नाहीत,त्यांनी जवळपास ५० दलित शिक्षक,शिक्षकेतर महिलांचे बचत गट स्थापन करुन त्यातून या सदस्यांच्या सुख-दु:ख,आर्थिक उन्नतीसाठी अनेक वर्षे अध्यक्षपदाची धुरा घेवून कार्यरत आहेत.पांडुरंग आणि प्रेमा देडे यांना तीन अपत्ये आहेत. थोरला अंकुर आयटी इंजिनिअर सॉफ्टवेअर इंजिनिअर जॉब करतो.दुसरा ऋषिकेश सिव्हील इंजिनिअर असून लातूर येथेच स्पर्धा परीक्षेची तयारी करतो आहे, तर मुलगी अस्मिता पुणे येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून सेवा बजावत आहे.

कर्मचारी म्हटला की,त्याच्या सेवाशर्ती,पदोन्नती,बदली,वेतनश्रेणी वाढ,संबंधित संस्थेची अकारण मनमानी आलीच.शाळा,महाविद्यालयातील लिपिक,शिपाई, ग्रंथपाल,चौकीदार,प्रयोगशाळा सहाय्यक,परिचर या शिक्षकेतर कर्मचार्यांच्या वाट्याला तर या समस्या आल्याच त्यामुळेच कर्मचार्यांच्या संघटना उदयाला येतात. तशी महाराष्ट्रातील हजारो शिक्षकेतर कर्मचार्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन झालेल्या शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या लातूर जिल्हा शाखेची निवडणूक १९९६ ला झाली. आणि त्यामध्ये पांडुरंग देडे हे सचिव म्हणून निवडून आले. पुढे ते विभागाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपाध्यक्षपदापर्यंत झेप घेवून शकले, यामागे त्यांच्यामध्ये असलेले संघटन कौशल्य महत्वाचे आहे. एकीकडे शिक्षकेतर कर्मचारी संघटना आणि दुसरीकडे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आ.विक्रम काळे यांच्या पाठराखणीमुळे देडे यांना शिक्षकेतर कर्मचार्यांच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी मोलाची मदत झाली. खाजगी शिक्षण संस्थेतील किंवा जिल्हा परिषदेतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावर झालेल्या सेवाविषयक अन्यायावर ते तुटून पडत असत. समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषदेचे सीईओ कडे सातत्याने कर्मचार्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी त्यांच्या पाठपुरावा करत असत.संस्थाचालक,मुख्याध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पदाधिकार्यांची समन्वय समितीचा आग्रह धरून त्या माध्यमातून कर्मचार्यांच्या प्रश्नांची तड लावण्यात त्यांनी कौशल्य पणाला लावले.कर्मचार्यांच्या प्रश्नांसाठी रितसर निवेदने देवून संबंधितांचे लक्ष वेधून,प्रसंगी आंदोलनाची भूमिका घेवून त्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे त्यांनी काम केले.

शासकीय कर्मचार्यांना सेवेच्या २४ वर्षानंतर एक वेतनश्रेणी वाढ मिळते पण खाजगी शाळातील शिक्षकेतरांना या नियमाचा लाभ मिळत नव्हता.तो मिळाला पाहिजे यासाठी शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे शासन,प्रशासनाकडे अनेक वर्षे सातत्यपूर्ण आग्रह धरला,त्याच्या या प्रयत्नाला अखेर यश आले असून,१जानेवारी २०२४ पासून खाजगी शिक्षकेतर कर्मचार्यांना निवडश्रेणी देण्याचे शासनाने मान्य केले आहे.यामुळे कर्मचार्यांच्या वेतनात वाढ होणार आहे,यात देडे यांचा खारीचा वाटा आहे असेच म्हणावे लागेल.

शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध उठावा ही अनेक वर्षांपासूनची मागणी प्रलंबित होती,शासनाकडून त्यावर सकारात्मक निर्णय होत नव्हता म्हणून शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्यावतीने औरंगाबाद येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीवर मोर्चा काढण्यात आला. तो आक्रमक बनला.वरिष्ठ पोलीस अधिकारी उध्दव कांबळे यांनी तुम्हाला काहीही करणार नाही असे सांगत मोर्चेकर्यांवर अश्रुधुराचा मारा करण्याचे आदेश दिले. यात शिक्षकेतरांना पोलीसांकडून मारहाणही केली गेली. याची राज्यभर प्रसारमाध्यमातून चर्चा झाली.मार मिळाला पण १२ ते १३ वर्षांपासून प्रलंबित कर्मचार्यांच्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधले गेले.२००० मध्ये या प्रश्नासाठी नागपूर विधिमंडळावर संघटनेचा मोर्चा काढण्यात आला.या लक्षवेधी मोर्चासमोर आ.वसंत काळे,आ.डी. के.देशमुख,यांच्यामुळे तत्कालीन शिक्षणमंत्री वसंत पुर्के यांनी स्वतः येवून निवेदन स्विकारुन



आकृतीबंधाचा अन्याय कारक निर्णय मागे घेत असल्याची घोषणा केली त्यानंतर अर्धा तास मोर्चेकर्यांनी नाचून आनंद व्यक्त केला तो क्षण जीवनातला अत्यानंद देणार होता,असे ते सांगतात.

माणसाच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी,घडण्यासाठी तसेच सामाजिक,सांस्कृतिक लढे लढताना अनेकांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ हवी असते,स्मृतीशेष वसंतराव काळे, आ.विक्रम काळे,आ.सतीष चव्हाण,मुध्यापध्यापक विजय चव्हाण,डॉ.गणेश देवी,प्रा.सुभाष वारे,डॉ.व्यंकटेश काब्दे,माधव बावगे,वैजनाथ कोरे,प्रा.ओमप्रकाश मदनसूरे,डॉ.मधुकर मुंडे,गणतराव तेलंगे,डॉ. सोमनाथ रोडे,डॉ.नागोराव कुंभार,व्यंकटेश हंबीरे,प्रा.मनोहर हिबारे,ॲड.मनोहरराव गोमारे,डॉ.माधव कोणे,ॲड.शेखर हविले,संग्राम माकणीकर,सूर्यप्रकाश धूत,ॲड.उदय गवारे,कॉ.डॉ.विठ्ठल मोरे,कॉ. विश्वंभर भोसले,संदिपान बडगिरे,निषा बडगीरे,दिलीप आरळीकर,सुनिता आरळीकर,प्रा.अर्जून जाधव,प्रा.सतीष इंगळे,ॲड.वसंत उगीले,ॲड.वसंत पात्रे,शिवाजी नरहरे,वा.ग.बेंबळकर,ॲड.शेख,संजय शेटे,रामकुमार रायवाडीकर,गोरख वाघमारे पैलवान,श्रीशैल्य बिराजदार आदी शेकडो साथींचा त्यांना स्नेह लाभला..

शिक्षण क्षेत्रात काम करताना सार्वत्रिक निवडणूक लढण्याचाही त्यांनी दोन वेळा विचार केला.मुरुड,बोरगाव काळे जिल्हा परिषद,पंचायत समिती मतदार संघातून लढण्याचा त्यांनी प्रयत्न केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीधर सिनेटची निवडणूक त्यांनी लढविली.यशवंत नागरी सहकारी बँकेवर सात वर्षे संचालक असताना शेकडो गरुजू तरुणांना कर्ज मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख तथा औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघाचे आ.विक्रम काळे हे अनेक वर्षे विधान परिषदेचे सदस्य राहिले आहेत,त्यांच्यामुळेही शिक्षकेतर कर्मचार्यांचे अनेक प्रश्न मार्गी लागण्यात मदत झाली.काही काळ देडे यांनी आ.विक्रम काळे यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणूनही काम पाहिले आहे. अंबाजोगाईचे डॉ.द्वाराकादास लोहिया यांच्या मानवलोक या सामाजिक संस्थेमध्येही त्यांनी सामाजिक कामाचा अनुभव घेतला.भूकंपानंतर,भूकंपग्रस्त भागातील काही मुले पालकत्व गमावून बसली,तिथे शासन प्रशासन कमी पडले तिथे राष्ट्रसेवा दलाच्या जाणकार कार्यकर्त्यांनी अशा बेसहारा मुलांच्या शिक्षण,निवास , भोजनाची जबाबदारी घेतली.त्यासाठी नळदुर्ग येथे आपलं घर हा उपक्रम सुरु करण्यात आला. या आपलं घर च्या उभारणीसह त्यातील संस्कार शिबिरे व इतर कामातही देडे यांनी आपल्या परीने अर्थपूर्ण सहभाग दिला.राष्ट्र सेवा दलाचे निळूफुले,डॉ. श्रीराम लागू,डॉ.नरेंद्र दाभोळकर,डॉ.एस.एम. जोशी,साथी पन्नालाल सुराणा यांच्या सान्निध्यात राहून विद्यार्थी दशेत सेवा दलाची संस्कार शिबिरे,बैठका, खेळ, पथनाट्यें या माध्यमातून त्यांना शिकायला मिळाले.निजामकालीन मराठवाड्यात उच्च शिक्षणाची सुविधा नव्हती म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाचा पाया घातला.त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला मिळावे म्हणून १९७८ पासून दलित पँथर व अन्य पुरोगामी संघटना,पक्षांनी अनेक वर्षे नामांतराचा लढा लढला.या लढ्यात पांडुरंग देडेंनी आपल्या परीने वेळ दिला. विद्यार्थी,शिष्यवृत्ती आदींचे लढेही ते लढले.महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कामात,आंतरजातीय विवाहाच्या उपक्रमातही ते हिरीरीने भाग घेत असतात.पळसप येथे किसान वाचनालय उभारणीचे श्रेय त्यांना जाते.लातूर जिल्हा मराठवाडा विकास परिषदेचे गेली १५ वर्षे ते सचिव म्हणून कार्यरत आहेत.

माणूसपण जगणार्याला स्वस्थ बसून देत नाही,त्यातला देडे परिवार.लातूरच्या बार्शी रोडवरील वाल्मिकी नगरात पांडुरंग देडे यांचे वास्तव्य आहे. तिथे शेजारी मित्र मंडळाच्या माध्यमातून सर्व जातीधर्माच्या रहिवाशांचे वाढदिवस,विवाह,सेवानिवृत्तीचे कार्यक्रम करणे अशा सुख-दु:खाच्या कार्यक्रमात देडे पती-पत्नींचा सहभाग उल्लेखनीय असतो.असे हे दुर्मिळ नगर असावे.

परिवर्तनवादी चळवळीत काम करणार्या व्यक्तीच्या विचारांची बैठक पक्की असावी लागते,त्यासाठी वाचन,मनन,चिंतन हवे,यासाठी देडे यांनी राष्ट्रसेवा दल पत्रिका,सुगावा,अस्मितादर्श,सत्याग्रही या मासिकांसह,महात्मा ज्योतिराव फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे,बाबुराव बागुल यांच्या ग्रंथांचे त्यांनी वाचन केले.समाजवादी विचारांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव आहे. विषेश म्हणजे त्यांनी कुठल्या पुरस्काराची अपेक्षा केली नाही प्रसंगी त्याला त्यांनी विनम्रपणे नकार दिला आहे,

शासन,प्रशासन,नागरिक,संघटना यांचे नाते अतुट आहे,प्रशासनाचा गाडा चालविताना अनेक प्रश्न निर्माण होता,त्यावर आवाज उठविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून पुढे आलेच पाहिजे,लढण्याची तयारी ठेवावीच लागते,प्रश्न सुटेपर्यंत सातत्याने पाठपुरावा हवा असतो.यातच कोणत्याही लढ्याचे यश असते,असे सांगून उर्वरित जीवन वंचितांच्या,सामाजिक सेवेसाठी घालविणार असल्याने पांडुरंग देडे यांनी सांगितले. अशा या समाजशील पांडुरंग देडे यांच्या उर्वरित आयुष्याला मनापासून सदिच्छा चिंतितो..

********

बाळ होळीकर,लातूर.
मो.नं.९१७५१०३७६७
बाळ होळीकर

# विळखा अमली पदार्थांचा : पुणे :नशेच्या अमलाखाली शहरातील रात्रजीवन

पुण्यातील पबमध्ये अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांची चित्रफीत व्हायरल झाल्यानंतर खळबळ उडाली असली, तरी हा प्रश्न फक्त पुण्यापुरताच नाही. अमली पदार्थ ज्या सहजपणे उपलब्ध होत आहेत आणि तरुण पिढी ज्या वेगाने त्यांच्या आहारी जात आहे, ते सगळे खरोखरच चिंताजनक आहे. काही हॉटेल्स आणि पब्जवर धाडी घालून हा प्रश्न सुटणार आहे का? त्याच्या मुळाशी जायची आपली इच्छा आणि तयारी आहे का? पुण्यात अफू, गांजा, चरस या अमली पदार्थांचे सेवन श्रमिक आणि उच्चभ्रू वर्गात केले जात होते, त्याला आता जवळपास ३० वर्षे उलटून गेली. १९९० च्या दशकात ब्राऊन शुगर अर्थात गर्दच्या विळख्यात तरुणाई अडकली. आता त्याची जागा मेफेड्रोनने घेतली आहे. आकर्षण, मित्रमंडळींचा आग्रह, पालकांनाच सेवन करताना पाहणे, प्रतिष्ठेचे लक्षण, हिरोगिरी आणि 'हे आता सर्वमान्य आहे,' हा समज अशा कारणांनी अमली पदार्थ सेवन करण्याकडे तरुणाई वळत आहे. साखरेप्रमाणे दिसणारे, गंधहीन, चवहीन मेफेड्रोनची चटक तरुणाईला लागली आहे. पुणे, मुंबईत वास्तव्य करणारे काही नाजयेरियन नागरिक या तस्करीत गुंतले आहेत. मेफेड्रोनसह 'एलएएसडी स्टॅंप'ची नशा करण्याचे प्रमाणही तरुणाईत वाढले आहे.गेल्या तीन दशकांत काय बदलले? पुणे ग्रामीण पोलिसांनी सिंहगड पायथ्याजवळ डोणजे गावात सुमारे २० वर्षांपूर्वी एका रेव्ह पार्टीवर छापा टाकला होता. या पार्टीत पुणे- मुंबईतील तरुण-तरुणी सामील झाले होते. रेव्ह पार्टी म्हणजे काय हा प्रकार तेव्हा सर्वसामान्यांना माहीत नव्हता. या पार्टीत सापडलेले अमली पदार्थ आणि त्यांचे सेवन करणारे विशी-पंचविशीतील तरुण हा त्या वेळी पुण्यात मोठ्या चर्चेचा विषय झाला होता. पुण्यासारख्या सांस्कृतिक शहरात असे काही होणे त्या वेळी नवीन होते. त्याच्या कारणांचा पाठपुरावा करताना बदललेल्या पुण्याचे चित्र समोर आले.

पुणे शहर आणि परिसरात साधारण अडीच दशकांपूर्वी आयटी पार्कच्या निमित्ताने माहिती तंत्रज्ञान कंपन्या सुरू झाल्या. देशभरातील तरुण-तरुणी नोकरीनिमित्ताने बाणेर, बालेवाडी, कल्याणीनगर, विमाननगर, पिंपळे सौदागर, बावधन आदी भागांत वास्तव्य करून राहिले. त्यांना मिळणाऱ्या गलेलठ्ठ पगारात मूलभूत गरजांबरोबरच मनोरंजनासाठी निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करणे सहज शक्य होऊ लागले. 'नवीन' अनुभव घेण्यास उत्सुक अशा 'ग्राहकां'साठी पब, रेस्टॉरंट, मद्यालयांचे पेव फुटले. रात्री उशिरापर्यंत पार्ट्या रंगू लागल्या. मोठ्या आवाजातील संगीत, त्यावर बेधुंद होऊन नृत्य आणि त्यातून मिळणारा आनंद तरुणाईला हवाहवासा वाटू लागला. पुण्याच्या परिघावर डान्स बार सुरू झाल्याचा काळही साधारण हाच. या मनोरंजनाची 'नशा' आणखी वाढविण्याच्या दृष्टीने अशा पार्ट्या, स्नेहसंमेलनांत अमली पदार्थांचा शिरकाव सुरू झाला.

कॅम्प, कोरेगाव पार्क, मुंढवा, कल्याणीनगर या विशेषत: पुण्याच्या परिघावर असलेल्या भागांमधील रात्र आणि रात्रोत्तर जीवन तरुणाईत लोकप्रिय होऊ लागले. यातील अनेक पब आणि बारमध्ये होणाऱ्या पाश्चात्त्य संगीताच्या कार्यक्रमांच्या जोडीला मद्याबरोबरच अमली पदार्थांची जोडही सहज मिळू लागली. अमली पदार्थांचे सेवन, मद्यापार्ट्यांचे पेव पुण्यात फुटले. या पार्ट्यांमुळे रहिवाशांना होणारा त्रास, पार्ट्यांनंतर होणारी भांडणे, छेडछाडीचे प्रकार हेही सर्व होतच होते. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर या सगळ्याचा कडेलोट होऊन सामान्य पुणेकराच्या सहनशीलतेचा अंत झाला. त्यानंतर लगेचच एल थ्री बारमधील पार्टीमुळे पुण्यातील रात्र जीवनाचे भीषण वास्तवही समाजासमोर आले.

अमली पदार्थ येतात कुठून? मुंबई, पुणे, बेंगळूरु, चंडीगड, दिल्लीसह देशभरातील प्रमुख शहरांत अमली पदार्थ तस्करांनी त्यांचे जाळे उभे केले आहे. गेल्या वर्षी पुण्यात अमली पदार्थ तस्कर ललित पाटीलच्या साथीदारांकडून कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्यानंतर तरुणांमधील नशेखोरी चर्चेत आली होती. अमली पदार्थ सेवन करणाऱ्या तरुणांकडून मेफेड्रोनला सर्वाधिक मागणी आहे. त्या खालोखाल गांजा, चरस, कोकेन, ब्राउन शुगर, अफू अशा अमली पदार्थांची विक्री शहरातील उच्चभ्रू भागांत होते. यातील काही पदार्थ तर पानटपरीवरदेखील मिळतात. या धंद्यात काही इराणी तस्करही सामील असल्याचे बोलले जाते.



अमली पदार्थांचे काही व्यवहार तर समाजमाध्यमांवरही होतात. विशिष्ट सांकेतिक नावांनी या पदार्थांची विक्री केली जाते. उदाहरणार्थ, मेफेड्रोनला सांकेतिक भाषेत 'म्याऊ, म्याऊ' असे म्हटले जाते. पुण्यात विकी व्यवहारांबरोबरच अमली पदार्थांचे उत्पादनही होत असल्याचे उघडकीस आले आहे. मध्यंतरी पुण्याजवळील कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत तयार करण्यात आलेले मेफेड्रोन थेट दिल्लीतून कुरिअरद्वारे लंडनला पाठविण्यात आल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर देशपातळीवरील तपास यंत्रणांनी अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली. मेफेड्रोन तस्करीत आंतराष्ट्रीय पातळीवरील बडे तस्कर गुंतल्याचे तपासात उघडकीस आले आहे. पुण्यात मेफेड्रोन तस्करांचे जाळे

पुण्यातील कोंढवा, विमाननगर, कोरेगाव पार्क, तसेच पिंपरी-चिंचवड शहर परिसरात अमली पदार्थांची विक्री केली जाते. अमली पदार्थांची नशा महाग असते. पुण्यात नोकरीसाठी आलेले माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तरुण, तसेच शिक्षणानिमित्त आलेले विद्यार्थी अमली पदार्थ विक्रेत्यांचे मुख्यत: सावज असतात. उच्चभ्रू भागातील हॉटेल, पबच्या बाहेर अमली पदार्थ विक्रेत्यांचा वावर असतो. एक ग्रॅम मेफेड्रोनची किंमत पाच ते दहा हजार रुपयांपर्यंत असते.

तपास यंत्रणांसमोर आव्हान मेफेड्रोन निर्मिती आणि तस्करीने देशभरातील तपास यंत्रणांसमोर आव्हान उभे केले आहे. पुणे पोलिसांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील अमली पदार्थ तस्करी प्रकरण उघडकीस आणले. पुणे, सोलापूर महामार्गावरील कुरकुंभ औद्योगिक वसाहत, सांगली, दिल्लीत छापे टाकून तीन हजार ७०० कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले. अमली पदार्थ तस्करी प्रकरणात पोलिसांनी आठ जणांना अटक केली होती.

# सेवानिवृत्तांशी (ज्येष्ठ नागरिकांशी) अधिक बोलले पाहिजे



भारत हा एकेकाळी कृषिप्रधान देश होता.८० टक्के लोक शेतीच्या उत्पादनावर आणि शेती करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यावर अवलंबून असत.त्यामुळेच शेती हा मोठा उद्योग धंदा होता.त्यात कोणी सेवा निवृत होण्याचा प्रश्न नव्हता आणि कोणाला पेन्शन मिळण्याची हमी नव्हती. शेतीचा सातबारा ज्याच्या नांवावर असायचा तोच कुटुंब प्रमुख असायचा त्यामुळे सर्व कुटुंब एकत्र राहत होते.एकत्र कुटुंबाची ताकद आणि जिव्हाळा हा कौतुकास्पद लक्षवेधी प्रेरणादायी होता. आजच्या काळात तो सह सहा कुठे दिसत नाही.कारण शेतीत काम करणारा तरुण नोकरीच्या शोधात गाव सोडून शहरात गेला. तेव्हा पासून कृषिप्रधान देशाचा अन्नदाता बळीराजाचा वारसदार कुटुंबा पासून वेगळा झाला.नोकरीसाठी आणि टू बी एच के साठी शेती विकून शहरवाशी झाला.त्यामुळे एकत्र कुटुंब पद्धत कधी मोडीत निघाली कोणालाच कळले नाही.तो गाव सोडून शहरात आलेला शेतकऱ्याचा मुलगा आता नोकरीतून सेवा निवृत झाला.त्याला त्यांच्याशी बोलायला माणसांना वेळ नाही.

सरकारी निमसरकारी,बँकेत,कंपनीत काम करणारे कामगार,कर्मचारी अधिकारी जेव्हा सेवा निवृत होतात.तेव्हा त्यांची खरी जगण्याची परीक्षा सुरू होते.कारण त्यांना सकाळी वेळेवर उठून पोट साफ करून तोंड धुवून अंगोळ करून कामावर जाण्याची खूप वर्षाची सवय असते. ते कामावर जातात म्हणून त्यांची काळजी घेणारे सुद्धा तेव्हा असतात.कामावर असल्या मुळेच कुटुंबात त्यांच्या शब्दाला वेगळे महत्व असते. कौटुंबिक समस्यावर त्यांनाच निर्णय घेण्याचा अधिकार सुद्धा असतो.अनेक वेळ चर्चा होत असतात.मुला मुलीचे शिक्षण,नंतर नोकरी त्यानंतर लग्न ह्या प्रत्येकाच्या घरात असतात.नोकरीत असतांना कोणी ही मदत देण्यासाठी तत्पर असतो. पण एकदा का सेवानिवृत झाला की अनेक मर्यादा येतात.जो सामाजिक जबाबदारी म्हणून समाजात संस्था,संघटने शी जुळलेला असतो. त्याला काही फरक पडत नाही.सुरवात पासून आता पर्यन्त सामाजिक जबाबदारी म्हणून ट्रेड युनियन मध्ये काम करत असल्यामुळे आज ही सेवानिवृत कामगार,कर्मचारी अधिकारी यांच्या कौटुंबिक समस्या येकायला मिळतात. ज्यांना संघटनेचे महत्व कळले ते सेवा निवृती नंतर सोसायटीतील लोकांना समाजातील किंवा विभागातील एकत्र करून सामाजिक संस्था स्थापन करून काम करतात.

नोकरीत असतांना घरातील नात्यातील समाजातील लोकांमध्ये मिळून मिसळून राहिले पाहिजे.मी सरकारी अधिकारी आहे.मला कोणाची गरज नाही.ही भावना मानसिकता मनातून काढून टाकली पाहिजे. तिचा परिणाम सेवा निवृती नंतर दिसून येतो. घरातील वृद्ध लोक जेव्हा जास्त बोलतात; वारंवार उपदेश करतात, कधीकधी ते टोमणे मारतात, तेव्हा घरातील तरूणांना व बाहेरच्या लोकांना त्यांचा राग येतो.परंतु डॉक्टर ते वरदान मानतात.डॉक्टर म्हणतात की सेवानिवृत्तांशी (ज्येष्ठ नागरिकांशी) अधिक बोलले पाहिजे कारण सध्या स्मरणशक्ती कमी होण्याचे रोखण्याचा कोणताही मार्ग नाही.अधिक बोलणे हा एकमेव मार्ग आहे.अति बोलण्याचे किमान तीन फायदे ज्येष्ठ नागरिकांना होतात.

प्रथम: बोलणे मेंदूला सक्रिय करते आणि मेंदू सक्रिय ठेवते, कारण भाषा आणि विचार एकमेकांशी संवाद साधतात,विशेषत: जेव्हा पटकन बोलले जाते,ज्यामुळे नैसर्गिक रित्या विचारांची गती जलद होते आणि स्मरणशक्ती देखील वाढते.जे ज्येष्ठ नागरिक बोलत नाहीत त्यांना स्मरणशक्ती कमी होण्याची शक्यता जास्त असते.त्यामुळे मग कुटुंबातील सर्वांच्या आनंदात हा कायम अडथळा लक्षात ठेवावा लागतो. त्या सेवा निवृत ज्येष्ठ नागरिकाला वेगळे ठेवावे लागते. त्यांची स्मरणशक्ती कायम ठेवण्या एवजी येवजी ती कमी होण्याचे मार्ग नाईलाजाने अवलंबवावे लागतात.

दुसरा ज्येष्ठ नागरिकांशी जास्त बोलल्याने तणाव दूर होतो,मानसिक आजार टळतो आणि तणाव कमी होतो.आपण अनेकदा काही बोलत नाही,परंतु आपण ते आपल्या हृदयात दडपतो आणि गुदमरल्यासारखे वाटते आणि अस्वस्थ वाटते हे खरे आहे. म्हणून,वरिष्ठांना अधिक बोलण्याची संधी देणे आरोग्यासाठी खूप चांगले होईल.बिना औषध इलाज केला जाऊ शकतो.असे डॉक्टर सांगतात.पण सुशिक्षित लोक त्याला महत्व न देता स्वार्थाला बायकोच्या म्हणण्याला महत्व देतात.त्याचा परिणाम निसर्ग नियमाने दुखमुक्तीत होतो.ज्येष्ठ नागरिक दुख मुक्त होतो आणि कुटुंबाला ही दुख मुक्त करतो.

तिसरा ज्येष्ठ नागरिकाशी बोलण्यामुळे चेहऱ्याच्या सक्रिय स्नायूंचा व्यायाम होतो तसेच घशाचा व्यायाम होतो आणि फुफ्फुसाची क्षमता वाढते,तसेच डोळे आणि कानांना होणारा हानीचा धोका कमी होतो आणि चक्कर येणे,डोके चढणे आणि बहिरेपणा यासारखे सुप्त धोके कमी होतात.थोडक्यात,सेवानिवृत्त,म्हणजे ज्येष्ठ नागरिक, अल्झायमरपासून बचाव करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तुम्ही शक्य तितके बोलणे आणि लोकांशी सक्रियपणे संवाद साधणे.याला दुसरा कोणताही इलाज नाही.शक्य तितक्या वरिष्ठांशी कुटुंबातील लोकानी बोलले पाहिजे.त्यामुळे अनेक फायदे होतात.

काही गोष्टी फक्त शांत राहून अनुभवायच्या असतात.तर काही मनात साठवून ठेवायच्या असतात.प्रत्येक गोष्टींचा बाजार मांडत गेलात तर भावनांचा आदर राहत नाही.देव नावाच प्रोडक्ट ब्राह्मणांनी बाजारात आणले आणि त्याची सर्व सुत्रे आपल्या हाती ठेवले.आज देव-देव करून होल अँण्ड सोल पणे आख्या मार्केटवर देवाच्या आडुन सर्वाच्या मन मस्तिष्काचा ताबा ब्राह्मणांनी सहज मिळवला आहे. त्यातून डॉक्टर,ईलेक्ट्रिकल इंजिनियर,हॉडव्हेर,सॉफ्व्हेर इंजिनियर,आटोमोबाईल इंजिनियर, विमानिक पायलेट,तज्ञ प्रतिष्ठित शास्त्रज्ञ सुद्धा सुटले नाही. ते सुद्धा यांच्या नियमाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करतात.पण आईवडिलांची जिवत पणी सेवा कमी आणि मेल्या नंतर कशाचीच कमी पडू देत नाही.सर्व प्रकारच्या विधी आणि दानधर्म, भोजन दान सढळ हस्ते करण्यासाठी वेळच वेळ असतो. जिवत असतांना सेवानिवृत्तांशी ज्येष्ठ नागरिकांशी अधिक बोलायला वेळ मिळत नसतो.काय ही मानसिकता एका दिवसात तयार झाली.कृषी प्रधान भारताची एकत्र कुटुंबाची पद्धत एका दिवसात नष्ट झाली. शिक्षणामुळे माणसांची प्रगती झाली. मग ते संस्कार कुठे गेले?.

आपण कोठेतरी चुकतोय तीन रुम किचनचा एखादा फ्लॅट,दोन चार एकरचे फार्म हाऊस एखादी चार चाकी गाडी आणि भौतिक वस्तूंचं प्रदर्शन मांडता आलं की आपण म्हणतो,अमक्या- तमक्यानं शून्यातून विश्व निर्माण केले. म्हणजे होतंय काय की सुख मिळेल या आशेने माणूस श्रीमंत होण्यासाठी धडपडतोय.पण सुखी काही दिसत नाही!.आपणचं म्हणतो की,आमच्या लहानपणी खूप मजा यायची. खूप करमायचं,घर भरलेलं असायचं.दिवस कधी मावळायचा ते कळायचंच नाही!.मग आता काय झालं ?मजा कुठ गेली?.एकटं एकटं का वाटतं ?.छातीत धडधड का होते ?.कशामुळे करमत नाही ? कारण.विश्व निर्माण करण्याची व्याख्या कुठेतरी चुकली. विश्व निर्माण करणं म्हणजे नाती गोती जपणं छंद जोपासणं पाहुणे होऊन जाणं पाहुण्यांचे स्वागत करणं खूप गप्पा मारणं घराच्या उंबऱ्यात चपलांचा ढिग दिसणं खळखळून हसणं आणि काळजातलं दुःख सांगून मोकळेपणाने रडणं.या गोष्टी आपण प्राप्त करू शकलो तर शून्यातून विश्व निर्माण केले असे म्हणावे. तुम्हीच सांगा आपल्या आयुष्यात या सर्व गोष्टींची वाढ झाली की घट झाली?. तुमचं खर दुःख तुम्ही मोकळेपणाने किती जणांना सांगू शकता असे किती मित्र,शेजारी,नातेवाईक आपण निर्माण करू शकलो.खूप कमी,किंवा नाहीच.मग आपण विश्व निर्माण केले काय?. तर नाही.

मित्र हो,रजिस्ट्री च्या कागदाच्या फायली म्हणजे विश्व.भौतिक साधनांची रेलचेल म्हणजे विश्व. लॉकर मध्ये ठेवलेले हिरे मोत्यांचे दागिने म्हणजे विश्व.मुखवटा घातलेल्या चेहऱ्यांची गर्दी म्हणजे विश्व नाही हे समजून घ्यावं लागेल,मोठं बनण्याच्या दडपणामुळे आणि मग कामाच्या व्यापामुळे नाती दूर जाणार असतील.इतरांना तुच्छ लेखण्यामुळे आणि अहंकारामुळे माणसं जवळ येणार नसतील दुःख सांगायला,मन हलकं करायला जागाच उरणार नसेल.तर आम्ही शून्यातून विश्व निर्माण केलं,की विश्वातून शून्य?.वाचा,विचार करा,अहंकार सोडा,माणूसकी जपा. इतरांच्या कामी या.सोबत काहीचं येत नाही.जबाबदारीची जाणीव असणारी माणसे फारशा सवाल-जवाबाच्या फंदात न पडता समोरील काम कसं पूर्ण करता येईल,यासाठी ते प्रयत्न सुरू करतात. म्हणूनच सेवानिवृत्तांशी (ज्येष्ठ नागरिकांशी) अधिक बोलले पाहिजे.ते बोलणे आपली मुले पाहतील तेव्हा त्याची अंमलबजावणी नक्की करतील.आयुष्यात चांगली माणसं कळत नकळत मिळतात, त्यांना तोडणे आणि टाळणे हा क्षणाचा खेळ असतो.मात्र जोडणं आणि जोडून ठेवणं हा संपूर्ण आयुष्याचा मेळ असतो.कल्पना आणि वास्तव, यात बरंच अंतर असतं! कल्पनेत.काहीपण लिहिता येतं,बोलता येतं.मात्र वास्तवाला सामोरं जावंच लागतं,वास्तवातच जगावं लागतं.आज आता प्रत्येक घरात सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक असेलच,किंवा जवळच्या नात्यातील कोणी तरी असेलच त्यांची दखल घेऊन त्यांच्या समाधनासाठी वेळ काढून बोल तेवढच त्यांचे समाधान होईल.

*********

सागर रामभाऊ तायडे-
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी बाल साहित्यिक डॉ. संगीता बर्वे यांनी साधला संवाद



लातूर : येथील अभिनव मानव विकास शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बाल साहित्यिक डॉ. संगीता बर्वे यांनी आपल्या साहित्याच्या जडणघडणीचे विश्लेषण अत्यंत सोप्या शब्दात करून उपस्थितांची मने जिंकली. श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच क्रीडा,विज्ञान ,साहित्य अशा विविधांगी क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान मिळावे यासाठी सातत्याने सर्वतोपरी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत ' संवाद लेखिकेशी ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बाल साहित्यिक डॉ. संगीता बर्वे, संगीतकार राजीव बर्वे, गायिका प्रांजली बर्वे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला . मंचावर प्रमुख अतिथींसह मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी यांचीही उपस्थिती होती. विद्यालयाच्या ' कस्तुर - कंचन सभागृहात रंगलेल्या या कार्यक्रमाने केवळ विद्यार्थीच नव्हे तर विद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षिकाही अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेले होते. यावेळी बोलताना डॉ. संगीता बर्वे यांनी गुगलपेक्षाही मानवी मेंदूच्या वापराचे महत्व अधिक असल्याचे उदाहरणासह दाखवून दिले. विद्यार्थ्यांनीच नाही तर प्रत्येकाने याकडे विशेषत्वाने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'गोरा गोरा एक ससा, रडू लागला ढसाढसा', ' ढगोबा ढगोबा चाललात कुठे' यासारख्या बाल कविता प्रस्तुत करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. गायिका प्रांजली बर्वे यांनी विद्यार्थ्यांना गीत गायन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. तर संगीतकार राजीव बर्वे यांनी मानवी जीवनात संगीताचे असलेले महत्व सोप्या शब्दात विशद केले.

मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांसाठी हा एक ऐतिहासिक , अविस्मरणीय असा कार्यक्रम असल्याचे सांगितले. . विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा, यासारखे उत्तम उदाहरण दुसरे असूच शकत नाही, एवढ्या सहज सोप्या शब्दात डॉ. संगीताताई बर्वे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व चांगले घडावे, यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जातात. अभ्यास एके अभ्यास असे स्वरूप न ठेवता विद्यार्थ्यांची सर्वंकष जडणघडण करण्याचा प्रयत्न संस्थेच्या वतीने केला जात असल्याचे सांगून रमाकांत स्वामी यांनी मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका सौ. सीमा कुलकर्णी यांनी करून दिला. सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ. माधुरी कणसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यालयाच्या सर्व अध्यापक - अध्यापिकांचे कौतुक केले आहे.

# अजितदादांनी शब्द पाळला! जानकरांसाठी माघार घेणाऱ्या विटेकरांना विधान परिषदेचे तिकीट



परभणी, : विधान परिषदेच्या ११ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राजेश विटेकर यांनी मंगळवारी (दि.२) मुंबई येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दोन जागांसाठी पक्षात मोठी चुरस विधान परिषदेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे विटेकर यांच्यासह पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांना सोमवारी सायंकाळी उमेदवारी जाहीर करण्यात आली. महायुतीतून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या दोन जागांसाठी पक्षात मोठी चुरस होती. मात्र अजित पवार यांनी विटेकर व गर्जे या दोघांचे नाव या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून निश्चित केले. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या विटेकरांनी तत्पुर्वी व त्यानंतरही जिल्हा परिषद, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा मध्यवर्ती बँक, नगरपालिका आदी संस्थांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राखले होते.पक्ष दुभंगल्यानंतरही विटेकर अजित पवारांच्या सोबतच पराभूत झाल्यानंतरही ते राष्ट्रवादीमध्ये सक्रीय राहिले. पक्ष दुभंगल्यानंतरही ते अजित पवारांच्या सोबतच राहिले. त्यातुनच परभणी लोकसभेची जागा महायुतीतून राष्ट्रवादी व विटेकरांना मिळणार हे स्पष्ट झाले होते. मात्र, बदलत्या समीकरणात त्यांना या निवडणुकीत थांबण्याची वेळ आली.

# पावसाळ्यात उडणाऱ्या कीटकांपासून मुक्त होण्याचे काही सोपे उपाय अवलंबवा

पाऊस पडल्यानंतर उडणारे कीटक घरात शिरणे ही सामान्य गोष्ट आहे. हे कीटक केवळ उपद्रवच नाहीत तर काही प्रकरणांमध्ये रोग देखील होऊ शकतात. पण घाबरू नका, या कीटकांपासून मुक्त होण्याचे काही सोपे आणि प्रभावी मार्ग आहेत.चला तर मग जाणून घेऊ या. १. घर स्वच्छ ठेवा: कचरा : घराभोवती कचरा टाकू नये. कचरा या कीटकांना आकर्षित करतो. खिडक्या खिडक्या आणि दरवाजे: खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवा, विशेषतः रात्री. ड्रेनेज: घराभोवती पाणी साचू देऊ नका. पाणी साठल्याने डास आणि इतर कीटकांची पैदास होते.प्रियंका चोपड़ा ने कुछ ऐसा किया कि निक जोनस भी हो गए हैरान और जानें २. नैसर्गिक उपाय वापरा: कडुलिंबाचे तेल: कडुलिंबाचे तेल कीटकांना दूर ठेवण्यासाठी खूप प्रभावी आहे. कडुलिंबाचे तेल पाण्यात मिसळून घराभोवती शिंपडा. लवंग : कीटकांना लवंगीचा वास आवडत नाही. लवंग पाण्यात उकळून घरात ठेवा किंवा कपड्यात बांधून घराच्या कानाकोपऱ्यात ठेवा. तुळस: तुळशीची वनस्पती देखील कीटकांपासून बचाव करण्यास मदत करते. तुळशीचे रोप घराबाहेर किंवा आत ठेवा. पुदिना : पुदिन्याचा वास देखील किडे दूर ठेवतो. पुदिन्याची पाने पाण्यात उकळून घरात ठेवा. ३. कीटकनाशके वापरा: कीटकनाशक फवारणी: बाजारात अनेक प्रकारच्या कीटकनाशक फवारण्या उपलब्ध आहेत. या फवारण्या घराभोवती वापरा, परंतु सावधगिरी बाळगा.इलेक्ट्रॉनिक कीटकनाशके: इलेक्ट्रॉनिक कीटकनाशके कीटकांना मारण्यासाठी देखील प्रभावी आहेत. मच्छरदाणी: झोपताना मच्छरदाणी वापरा. ४. काही इतर उपाय: प्रकाशयोजना: घराबाहेरील प्रकाश कमी करा. तेजस्वी प्रकाश कीटकांना आकर्षित करतो. जाळी: कीटक पकडण्यासाठी जाळी वापरा. कीटक नियंत्रण सेवा : कीटक समस्या गंभीर असल्यास, व्यावसायिक कीटक नियंत्रण सेवेशी संपर्क साधा. या उपायांव्यतिरिक्त, काही गोष्टी लक्षात ठेवणे देखील महत्त्वाचे आहे: खबरदारी: कीटकनाशके वापरताना काळजी घ्या. मुले आणि पाळीव प्राणी त्यांच्यापासून दूर ठेवा. नियमित स्वच्छता करणे : घर नियमितपणे स्वच्छ करा, विशेषत: कोपरे आणि भेगा. हिवाळ्यात: हिवाळ्यात कीटक कमी होतात, म्हणून यावेळी घर पूर्णपणे स्वच्छ करा. या सोप्या उपायांचा अवलंब करून तुम्ही घरातील उडणाऱ्या कीटकांपासून मुक्त होऊ शकता आणि स्वच्छ आणि सुरक्षित वातावरणात राहू शकता.

## नेहमी आकर्षक दिसण्यासाठी कमी उंचीच्या मुलींनी असे कपडे घालावेत

प्रत्येक मुलगी सुंदर असते, मग तिची उंची कितीही असो. पण जर तुमची उंची कमी असेल तर तुम्ही काही स्टाइलिंग टिप्स फॉलो करून तुमचा लूक सुधारू शकता आणि स्वतःला अधिक आकर्षक बनवू शकता. कपड्यांची निवड: १. क्रॉप टॉप आणि लाँग बॉटम्स: वर शॉर्ट टॉप किंवा ब्लाउज आणि खाली लांब स्कर्ट किंवा पॅन्ट घाला. यामुळे तुमची उंची अधिक उंच दिसेल. २. उच्च कंबर: उच्च कंबर जीन्स, स्कर्ट किंवा ड्रेस घाला. यामुळे तुमची उंची लांब दिसेल. ३. वर्टिकल स्ट्राइप्स: उभ्या पट्ट्यांचे कपडे घाला. हे तुमची उंची वाढवण्यास मदत करतात. ४. मोनोक्रोमॅटिक लुक: एकाच रंगाचे कपडे घाला. यामुळे तुमची उंची उंच दिसेल आणि तुमचा लुक स्टायलिश दिसेल. ५. बेल्टचा वापर: बेल्ट वापरून तुमची कंबर हायलाइट करा.

# आयएमए लातूरच्या वतीने डॉक्टर्स डे उत्साहात साजरा







लातूर : इंडियन मेडिकल असोसिएशन अर्थात आयएमए च्या लातूर शाखेच्या वतीने जागतिक वैद्यकीय दिवस ' डॉक्टर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. डॉक्टर्स डे चे औचित्य साधून लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनजागृतीपर आरोग्यविषयक पथनाट्यही सादर करण्यात आले. या कार्यक्रमास विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते- पाटील, उप अधिष्ठाता तथा आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, उप अधिष्ठाता डॉ. अजय ओव्हळ , उप अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण, आयएमएचे सचिव डॉ. गणेश बंदखडके,आयएमएचे कोषाध्यक्ष डॉ. संगमेश चवंडा ,आयएमए महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. विमल डोळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव, डॉ. उमेश लाड, डॉ. महादेव बनसोडे, डॉ. मेघराज चावडा यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी आयएमएच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाह्यरुग्ण विभागात आरोग्यविषयक पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यात डॉ. देवेश देशपांडे यांसह वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या डॉ. अनिकेत गोडाम ,डॉ. गोपाळ सोळुंके, डॉ. सिद्धेश येऊल, डॉ. मेधांश शिंदे, डॉ. यश जळकोटकर, डॉ. शिवम सूर्यवंशी, डॉ. श्रद्धा कल्लूरकर, डॉ. श्रद्धा तुपे, डॉ. धनश्री या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. उदय मोहिते - पाटील यांनी डॉक्टर्स डे चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे यांनी डॉक्टर्स डे च्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास मान्यवरांनी वेळात वेळ काढून उपस्थिती लावल्याबद्दल आभार व्यक्त करून भविष्यात लातूर आयएमएच्या वतीने विविध आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# विद्यार्थी युवक युवतीनी अनोळखी व्यक्ती ची सोशल मीडियावर फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये - पो.नी. सुनील बिर्ला





किनवट/शेख शौकत :- माहिती तंत्रज्ञान युगातील अभूतपूर्व प्रगतीचे युग असून सध्याचे युगात मोबाईल व कम्प्युटर याच्यापासून दूर राहुन प्रगती साधने शक्य नाही पण आपल्या आजूबाजूला व वर्तमानपत्रात नेहमी सोशल मीडियावरील फसवणुकी बाबतच्या बातम्या येत असतात व यातून अनेक अनुचित प्रकार घडत आहेत हे लक्षात घेऊन कोणत्याही गोष्टीची चांगली आणि वाईट दोन्ही बाजू असतात हेच आजकालच्या तरुण युवक युवतीने समजून घेऊन मोबाईल वापरून त्याचा सकारात्मक अभ्यासासाठी उपयोग घ्यावा पण सोशल मीडिया वापरत असताना दक्षता बाळगून अनोळखी व्यक्तीची समाज माध्यमावरील मैत्री विनंती स्वीकारू नये असे आव्हान किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला साहेब यांनी मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड आयोजित कृषी उत्पन्न बाजार समिती किनवट येथील कार्यक्रमात गुणवंत प्रतिभावंत व यशस्वी शेतकरी यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना व्यक्त केले. कृषी उत्पन्न बाजार समिती किनवट येथील दालनात गुणवंत प्रतिभावंत व यशस्वी शेतकऱ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद प्राध्यापक तौर सर यांनी भूषविले तर मराठी पत्रकार परिषद चे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष फुलाजी गरड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी यशस्वी व्यापारी यशस्वी शेतकरी व विविध क्षेत्रातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थित होती. प्राध्यापक शिवदास बोकडे यांनी प्रस्ताविक करताना गुणवंत प्रतिभावंत यांचा सत्कार करण्या मागचे विस्तृतपणे महत्त्व समजून सांगून विद्यार्थ्यांना यातून प्रेरणा मिळून त्यांना आपल्या पाठीवर कुणीतरी शाबासकीची थाप मारत असल्याची जाणीव होऊन त्यांचा अभ्यासातील उत्साहात द्विगुणीत होतो असे सांगितले. सूत्रसंचालन मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष प्रा. दगडू भरकर यांनी केले.

# लाडकी बहीण योजनेत झाला लाडकी बहीण योजनेत झाला मोठा बदल, आता 'या' महीलांनाही मिळणार लाभ

मुंबई :- राज्यातल्या महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजने अंतर्गत महिलांना दर महीना दिड हजार रूपये मिळणार आहेत. ही रक्कम थेट त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. या योजनेसाठी कोण महिला पात्र ठरणार आहेत, याची नियमावली सरकारने जाहीर केली आहे. यातले काही नियम सरकारने शिथिल केले आहेत. त्यामुळे या योजनेचा आणखी काही महिलांना लाभ होणार आहे. कोणते नियम शिथिल करण्यात आले आहेत. याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली आहे. त्यानुसार महिलांच्या वयात शिथिलता आणण्यात आली आहे. शिवाय जमिनीबाबतची अट वगळण्यात आली आहे.

कोणत्या महिलांना लाभ मिळणार? मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे. ज्या महिलांचे वय २१ ते ६० वर्ष आहे, त्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला या योजनेसाठी पात्र आहेत. महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखापेक्षा जास्त नसावे. ज्यांचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत आहे, त्याच महिलांना या योजनेचा लाभ होणार आहे.आधार लिंक असणाऱ्या खात्यात या योजने अंतर्गत थेट दिड हजार रूपये जमा होणार आहेत. कोणत्या महिलांना मिळणार 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ नव्या नियमा नुसार कोणात्या महिला पात्र? आता यातील काही नियम शिथिल करण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र महिलांच्या वयात शिथिलता आणण्यात आली आहे. जा महिलांचे वय ६५ वर्षे आहे त्या महिलांनाही या योजनेचा लाभ होणार आहे. पहिल्यांदा वयाची अट ही २१ ते ६० वर्षापर्यंत होती. त्यात आता बदल करण्यात आला असून ज्या महिलांचे वय २१ ते ६५ वर्षा पर्यंत आहे त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. शिवाय जमिनीची अटही शिथिल करण्यात आली आहे. ज्या महिलेकडे किंवी तिच्या कुटुंबाकडे पाच एकर पेक्षा जास्त जमिन असेल ती महिला या योजनेसाठी अपात्र ठरणार होती. मात्र त्यातही आता बदल करण्यात आला आहे. जमिनीबाबतची अट आता वगळण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी केली घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेत करण्यात आलेल्या बदलाची माहिती दिली. त्यानुसार आता ६५ वर्षे वय असलेल्या महिलांनाही त्याचा फायदा होणार आहे. अर्ज करण्यासाठी गर्दी होत आहे. याची दखल सरकारने घेतली असल्याचेही ते म्हणाले. शिवाय वेळ निघून जाणार नाही याची काळजी सरकार घेईल. जर पैसे खात्यात जमा होण्यास वेळ लागला तर जुलै महिन्या पासूनचे सर्व पैसे एकदम खात्यात जमा केले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले. बहीण लाडकी योजनाही महायुतीच्या भावांकडून बहीणींना दिलेला आहेर आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

योजनेसाठी कोण ठरणार अपात्र ? ज्या कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखा पेक्षा जास्त असेल अशा कुटुंबातील महिलेला या योजनेचा लाभ मिळणार नाही. या शिवाय घरातील कोणी टॅक्स भरत असेल, कुटुंबातली कोणतीही व्यक्ती सरकारी नोकरीत असेल, कोणी निवृत्ती वेतन घेत असेल, ट्रॅक्टर सोडून घरात जर चार चाकी असेल तरही ती अपात्र समजली जाईल. शिवाय ज्या कुटुंबातली व्यक्ती आजी माजी आमदार खासदार असेल तर ती व्यक्तीही या योजनेसाठी अपात्र ठरणार आहे.

# डॉक्टरांच्या सेवावृत्तीची प्रत्येकाने जाणीव ठेवावी..! -माजी आमदार बब्रूवान खंदाडे यांचे प्रतिपादन






अहमदपूर :- डॉक्टरांनी रूग्नांच्या सेवेत सातत्याने समर्पित भावनेने काम केले असून डॉक्टरांच्या या सेवावृत्तीची समाजाने सातत्याने जाणीव ठेवावी असे प्रतिपादन माजी आमदार बब्रूवान खंदाडे यांनी केले. सम्राट मित्रमंडळ -लातूर- अहमदपूर च्या वतीने डॉक्टर दिनाच्या निमित्ताने शहरातील डॉक्टर बांधवांच्या सत्कार सोहळ्यात ते अध्यक्ष पदावरून बोलत होते.प्रमुख पाहूणे म्हणून सत्कार मूर्ती म्हणून डॉ.चंद्रकांत उगीले, माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ.ओमप्रकाश किनगांवकर,डॉ.मधुसूदन चेरेकर,डॉ. राजूरकर,डॉ. सतिश पेड,डॉ.निलेश मजगे,डॉ. पदातूरे, डॉ.होळकर,डॉ.जोशी, डॉ.कराड, डॉ. अखिल शेख, डॉ.मूंडे,डॉ.अमृत चिवडे, सय्यद अनवर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सर्व डॉक्टर्स मंडळींचा शाल पुष्पगूच्छ देवून सम्राट मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संयोजक डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी म्हणाले की,जनतेची थेट सेवा करता येणारे क्षेत्र म्हणून वैद्यकीय क्षेत्राकडे पाहीले जाते.आज खूप मोठ्या प्रमाणात वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा उपयोग होत असून यातून मानवी जीवन सुखी,संरक्षीत करण्याचा प्रयत्न होत आहे.करोना सारख्या महामारीमध्ये आपल्या जीवाची पर्वा न करता डॉक्टर्स मंडळींनी करोडो लोकांचे जीव वाचविले आहेत.त्यामूळे संबंध मानव जातीवर डॉक्टर्स मंडळींचे उपकार आहेत असं म्हटलं तर ते धाडसाचं ठरणार नाही.या सेवेबद्दल मानवी समाज कृतज्ञ आहे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी डॉक्टर ओमप्रकाश किनगांवकर,डॉ. मधुसूदन चेरेकर,डॉ.स्वामी यांची समायोचीत भाषणे झाली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन मारोती बुद्रुक पाटील यांनी केले तर आभार विलास चापोलीकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामानंद मूंडे, अजय कराड,शाम मूसळे, अजय भालेराव,सचिन बानाटे,गणेशराव मूंडे, आकाश सांगवीकर, त्रीशरण मोहगांवकर, भीमराव कांबळे,पिंटू जंगले,आकाश पवार, मोहम्मद पठाण,शहारूख पठाण,आदींनी पुढाकार घेतला.

# युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी प्रविणकुमार बिरादार यांची निवड

लातूर : महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रविणकुमार सुदर्शनराव बिरादार यांची लातूर जिल्हा युवक काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.व्ही. श्रीनिवासन यांनी केली आहे.



प्रविणकुमार बिरादार हे युवक काँग्रेसच्या प्रदेश पातळीवर सक्रिय पक्षाचे काम करणारे पदाधिकारी आहेत. आ.सत्यजीत तांबे प्रदेशाध्यक्ष असताना त्यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी निवड झाली होती. नंतर झालेल्या युवक काँग्रेसच्या निवडणूकीत कुणाल राऊत प्रदेशाध्यक्ष असताना प्रदेश सरचिटणीस म्हणून निवडून आले आहेत. तसेच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय समन्वयक म्हणून आज काम करीत आहेत. पक्षाने दिलेले कोणतेही काम अतीशय जबाबदारीने व प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा त्यांचा हातखंडा आहे. म्हणूनच भारत जोडो यात्रेत १७ दिवस खा.राहुल गांधीच्या यात्रेच्या मिडीया विभागाची जबाबदारी पार पाडली होती. याबद्दल काँग्रेस पक्षातील प्रदेश पातळीवरील सर्व नेत्यांनी त्यांचे कौतुक केले होते. यासोबतच कोरोना काळात मदत हेल्पलाईन मुख्य समन्वयक म्हणून त्यांनी केलेल्या कामाचेही राज्यभर कौतुक झाले होते. बिहारच्या विधानसभा निवडणुकीत बिहारमध्ये जावून पक्षाचे काम केले होते. यासोबतच नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत गोवा, जम्मु काश्मीर व लडाख येथे त्यांनी काम केले होते. त्यांचे पक्षातील काम पाहून जिल्ह्यातील पक्षांच्या नेत्यांच्या आशिर्वादाने युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.व्ही.श्रीनिवासन यांनी प्रविणकुमार सुदर्शनराव बिरादार यांची लातूर जिल्हा युवक काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. या निवडीबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख, खा.डॉ. शिवाजी काळगे, आ.धिरज देशमुख, जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेसच्या असंख्य पदाधिकार्यांनी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रविणकुमार बिरादार यांचे अभिनंदन केले आहे.

# अनाथांच्या नाथ माई शारदा लोंढे हिंदुस्थान रत्न गोल्डन हार्ट २०२४ पुरस्काराने सन्मानित..!

सांगली / प्रतिनिधी : - गोरगरीब, निराधार, बेघर, अनाथ मुलांची आणि वृद्धमायबाप यांची निस्वार्थपणे निष्ठेने सेवा करणाऱ्या, सांगली जिल्ह्यातील मिरज येथील शारदा वृद्धसेवाश्रम, संकुलच्या संचालिका, समाजसेविका तथा अनाथांच्या नाथ माई शारदा लोंढे यांना गोल्डनकेअर क्लब, बंगलोर कर्नाटक राज्य या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेने त्यांच्या समाजसेवाकार्याची उच्च पातळीवर दखल घेऊन, त्यांना अत्युच्य मानाच्या अलौकिक अशा हिंदुस्थान रत्न गोल्डन हार्ट अवॉर्ड २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



आजच्या शारदा लोंढे या पूर्वाश्रमीच्या कोल्हापूर जिल्ह्यातील एका अनाथ आश्रम मध्ये वास्तव्य केलेल्या अनाथ कन्या होय. अनाथ आश्रम मधील निराधार, अनाथ मुलां-मुलींची दुःखे पाहून त्या नेहमीच अस्वस्थ होत. अनाथांचे कैवारी जेष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे ( दादा ) यांच्या त्या मानस कन्या आहेत. आश्रममध्ये त्यांच्या आश्रयाखाली राहून, त्यांच्या प्रेरणेने त्यांनी स्वतः ला समाजसेवाकार्याला वाहून घेतलं आहे. साक्षात जनकल्याणासाठी जन्मलेल्या शारदामाई प्रसिद्धी माध्यमापासून नेहमीच अलिप्त राहिल्या आहेत. शारदामाई सध्या शारदा वृद्धसेवाश्रम मधील आश्रित वृद्ध मायबापांची मनोभावे अहोरात्र सेवा शुश्रूषा करत आहेत. निराधार, अनाथ मुलांच्या आणि वृद्ध मायबाप यांच्याप्रती त्यांच्या अंत:करणात जन्मजात मायेचा अपार ओलावा असल्याने, आजही त्या स्वतः वृद्धाश्रममध्ये वास्तव्य करत आहेत. दिपगंगा भागीरथी बहुद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे यांच्या त्या पत्नी आहेत. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरजचे जनसंपर्क अधिकारी मा. आर्यदिप लोंढे यांच्या त्या मातोश्री होत. अनाथांची नाथ माई शारदा लोंढे यांना हिंदुस्थान रत्न गोल्डन हार्ट पुरस्कार २०२४ मिळाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरातून त्यांच्यावर अभिनंदन आणि कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# इतर मगास बहुजन कल्याण विभागामार्फत उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी वसतिगृह सुविधा

### २० जुलैपर्यंत गृहपाल यांच्याकडे अर्ज करण्याचे आवाहन

लातूर :- राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी सन २०२३-२४ पासून वसतिगृह सुरू केलेले आहेत. या योजनेतंर्गत लातूर जिल्ह्यात मुला-मुलींची प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेची वसतिगृहे सुरु करण्यात आली असून या वसतिगृहात विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य सुविधा निशुल्क स्वरुपात दिली जाणार आहे. वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक मुला-मुलींनी संबंधित वसतिगृहाचे गृहपाल यांच्याकडे २० जुलै २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसतिगृह योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा, त्याच्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या पाल्कानाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयेपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या, तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. तसेच विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा, अशा विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. या अटी पूर्ण करणाऱ्या मुलींनी लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल यांच्याकडे येथे अर्ज करावा. अर्जाचा नमुना गृहपाल यांच्याकडे विनामुल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी गृहपाल वृषाली बडे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२६११८३) यांच्याशी संपर्क करावा. तसेच वसतिगृहात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या मुलांनी लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांच्याकडे अर्ज करावा. अधिक माहितीसाठी गृहपाल पात्रे अनुप (भ्रमणध्वनी क्र. ८२०८७८३६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक एस. एन.चिकुर्ते यांनी केले आहे.

# शिवीगाळ प्रकरणी अंबादास दानवेंचं ५ दिवसांसाठी निलंबन

विधानपरिषदेत आपल्या दिशेने हातवारे केले म्हणून संतप्त झालेले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सोमवारी भाजपा सदस्य प्रसाद लाड यांना शिवी हासडली होती. त्यांच्या वक्तव्यावरून आजही सभागृहात गदारोळ झाला. दानवे यांचे निलंबन करावे, अशी मागणी प्रसाद लाड यांनी केली. यानंतर उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी दानवे यांचे पाच दिवसांसाठी निलंबन केले आहे. राहुल गांधींच्या वक्तव्याचे लोण थेट विधिमंडळात विधिमंडळाच्या अधिवेशनासोबतच दिल्लीत लोकसभेचेही अधिवेशन सुरू आहे. सोमवारी या अधिवेशनाचे कामकाज सुरू असताना लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी एका धर्मियांबद्दल अपशब्द वापरल्याचा आरोप करत सत्ताधाऱ्यांनी हंगामा केला. त्याचे लोण थेट राज्य विधिमंडळाच्या विधान परिषदेत पोहोचले. भाजपा सदस्य प्रसाद लाड यांनी आक्रमक भूमिका घेत संसदेतील कथित वक्तव्याप्रकरणी राहुल गांधी यांच्या निषेधाचा सभागृहात ठराव करून तो लोकसभेकडे पाठवावा, अशी मागणी केली. भाजपाच्या अन्य सदस्यांनीही लाड यांच्या मागणीला प्रतिसाद देत सभागृहात हंगामा केला. सत्ताधाऱ्यांचा हंगामा सुरू असतानाच विधान परिषद विरोधी पक्षनेते दानवे भाषण करायला उभे राहिले. ते म्हणाले, हा प्रकार लोकसभेत झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा विधान परिषदेच्या कामकाजाशी काहीही संबंध नसल्याचे ते बोलत होते. दानवे-लाड यांच्यात अप-शाब्दिक चकमक दानवे यांचे भाषण सुरू असतानाच लाड हे त्यांच्या दिशेने हातवारे करत बोलत होते. त्यामुळे आपल्या दिशेने हातवारे न करता आपण उपसभापतींच्या दिशेने बोलावे, अशी सूचना दानवे यांनी केली. तरीही लाड हातवारे थांबू शकले नाहीत. यामुळे संतापलेल्या दानवे यांनी लाड यांना शिवी हासडली. लाड यांच्याकडून पलटवार झाल्यामुळे दानवे यांनी दुसऱ्यांदा लाड यांना अपशब्द वापरले. यावेळी भाजपा गटनेते उभे राहिले आणि दानवे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सभागृहात असा प्रकार यापूर्वी कधीही घडला नाही. त्यामुळे दानवे यांनी माफी मागावी, असा दरेकर यांनी आग्रह केला. या घटनेनंतर विधान परिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी नाराजी व्यक्त करत सभागृह दिवसभर तहकूब केले होते.



# संभाजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात संपन्न

मुरुड/महेंद्र आल्टे : दिनांक २१ जून २०२४ रोजी महाविद्यालयात दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात संपन्न झाला.महर्षी पतंजली योग समिती शाखा मुरुडचे योग गुरु काशीरामजी खंडेलवाल, धनंजय बोरकर, नंदकिशोर कचोलिया, सुदर्शन मगर, भोंग पाटील इ. महाविद्यालयाच्या निमंत्रणाचा स्वीकार करून योगासनांच्या प्रात्यक्षिकाचे शास्त्रीय दृष्टिकोनातून सादरीकरण करून सर्व उपस्थितांकडून योगासने करून घेतली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस योगाचे मूळ उद्गाते भगवान गौतम बुद्ध व शक्ती देवता महाबली बजरंगाच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार घालून करण्यात आले. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी योगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. चालू वर्षी स्वतः व समाजासाठी योग ही संकल्पना राबविण्यात आली. उपस्थितांना सर्वप्रथम योगासने करण्यापूर्वी, करत असताना व केल्यानंतर करावयाच्या मार्गदर्शक तत्त्वांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शरीर व मनाची अवस्था, आहार, श्वसनाची गती, अंघोळवय इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले. सर्वप्रथम सर्वसाधारण जाणीव जागृतीसाठी मन शरीर व आत्म्याच्या सुसंवादासाठी सूर्यनमस्कार व सर्वसाधारण सूक्ष्म व्यायाम प्रकार घेण्यात आले त्यानंतर योगाच्या ऐतिहासिक वाटचालीतील टप्पे प्रार्थना शांतीपाठ संकल्प नियम असणे प्राणायाम प्रत्याहार ध्यानधारणा व समाधी या अष्टांग योगा बाबत वैज्ञानिक माहिती व प्रात्यक्षिकांच्या रूपाने ज्ञान देऊन हर्ष व उत्साह निर्माण केला गेला. सर्वप्रथम दोन मिनिटांची प्रार्थना घेण्यात आली. प्रार्थनेनंतर पूरक व्यायाम प्रकार घेण्यात आले त्यामध्ये मान, खांदा, कंबर, गुडघे पायाचे व्यायाम घेण्यात आले. त्यानंतर उभे राहून करावयाचे




असणे उदाहरणार्थ ताडासन, वृक्षासन, पाद हस्तासन, अर्ज चक्रासन, त्रिकोणासन इत्यादी घेण्यात आली.बैठ्या स्थितीतील दंडासन, भद्रासन, वज्रासन, उर्ध्व उष्ट्रासन, शशांक आसन, वक्रासन, उत्तम मंडूकासन इत्यादी आसने घेण्यात आली.पोटावर झोपून मकरासन, भुजंगासन, शल्बासन, इत्यादी असणे घेण्यात आली त्यानंतर प्राणायाम घेण्यात आले. योग साधनेमुळे सर्व काही शक्य होते त्यामुळे प्रत्येक नागरिकाने योगासन करणे आवश्यक आहे. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE